नि.फौ.ख.क्रं. २४५/२०२४
शासन वि. बाळासाहेब
नि.क्र. ५१/क

**सरकारतर्फे साक्षीदार क्रं.०६ यांची शपथेवर जबानी**

| | | |
|---|---|---|
| नाव | : | बबन धोंडीबा श्रीराम |
| वय | : | ५० वर्षे |
| व्यवसाय | : | शेती |
| राहणार | : | हनुमंत गाव, ता. आष्टी जि. बीड |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सरकारी वकील श्री.व्ही.एस. गव्हाळे यांचेमार्फत**

०१. दि. ०६.१२.२०२४ रोजी ११ वाजता जाधव पोलीसांना मला पंचनाम्यासाठी राजेंद्र मदने यांच्या घरी शिराळ हनुमंत गाव रोडवर मदने वस्ती वर बोलावले होते. घटनास्थळ वंदना मदने यांनी दाखविले. घटनास्थळी एक दगड आणि फावडा फिर्यादीने दाखविला. पोलीसांनी पंचनाम्यावर सही करायला सांगितले. आमच्या समक्ष पंचनामा केला. घटनास्थळाच्या पश्चिमेला राजेंद्र मदने यांचे घर, पुर्वेला हनुमंत गाव शिराळा रोड, दक्षिणेला बाळू मदने यांचे घर, उत्तरेला रावसाहेब मदने यांचे घर आहे. साक्षीदारास पंचनामा दाखविला त्यातील नकाशा दिसत्या परिस्थीतीचा आहे. त्यातील मजकूर खरा बरोबर आहे त्यावर माझी अनु. क्र. नं. १ वर सही आहे. पंचनामा १० ते ११ च्या दरम्यान केला.

२. माझ्या समक्ष जप्त केलेला दगड व लोखंडी फावडे पाहिल्यास मी ओळखु शकतो. साक्षीदारास जी.एम.पी. नंबर ३३/२०२५ वरील मुद्येमाल दाखवण्यात आला. साक्षीदाराने मुद्येमाल तोच असल्याचे ओळखले. दगडास व लोखंडी फावड्यास अनुक्रमे **एम.ओ. १ व २** देण्यात आला आहे.

**सरतपास पुर्ण**

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. ए.एस. निंबाळकर यांच्यातर्फे उलटतपास सुरु-**

३. माझे १० वी पर्यंत शिक्षण झाले आहे. मदने वस्ती ते शिराळ दीड कि.मी अंतर आहे. फिर्यादी व माझे नाते नाही. माझे आईचे नाव वैजंताबाई आहे. फिर्यादचे सासूचे नाव मंदाबाई आहे. अमान्य की, मंदाबाई मावशी आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी रस्तयाने जात असताना काय घडले असे बघून थांबलो. हे म्हणणे खरे आहे की, मला नोटीस दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी लिहून आणलेल्या कागदावर सही करायला सांगितली म्हणून मी सही केली. मी फिर्यादी व फिर्यादीच्या पतीस पुर्वीपासून ओळखतो. घटनेबाबत मला व्यक्तीशः काही माहिती नाही. फिर्यादी व आरोपीचे घरे चिटकून आहेत. फिर्यादीच्या उत्तर बाजूस सोनाजी मदनेचे घर आहे. घटनास्थळावरचा रस्ता वरदळीचा असून लोकांचे येणेजाणे असते, त्यामुळे घटनास्थळी १० ते १२ लोक जमले होते.

फिर्यादीच्या घराजवळ जनावरांचा गोठा आहे. हे म्हणणे खरे आहे की, गोठयात दगड, माती, फावडे पडलेले असतात. हे म्हणणे खरे आहे की, फावडे बाजारात सहज उपलब्ध होतील. अमान्य की, फिर्यादीशी माझे सलोख्याचे संबंध आहे. हे म्हणणे खरे आहे की, सतिश सखाहरी श्रीराम हा माझा चुलत भाउ आहे. मी आरोपींना व त्याच्या कुटुंबीयांना ओळखतो.

४. आरोपीकडे टॅक्टर असून तो सपाटी करण्याचे काम करतो. माझी व भाउ सतिश याची जमीन शेजारी शेजारी आहे. हे म्हणणे खरे आहे की, २०२२ साली आरोपी सतिशच्या जमीनीत सपाटीकरण करित होता. हे म्हणणे खरे आहे की, माझा व भाउ सतिश याचा कोणाकडे जास्त शेत जाते या कारणावरुन वाद आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी माझ्या जमीनीत सपाटीकरण करत आहे असे समजून त्याला मी आडवले. हे म्हणणे खरे आहे की, मी त्यावेळस आरोपी बाळूला बोललो. अमान्य की, मी आरोपीला शिवीगाळ केली. अमान्य की, आरोपीचा मला राग आहे. मी घड्याळ वापरत नाही मोबाईल वापरतो. माझी जन्म तारीख लक्षात नाही. अमान्य की, पंचनाम्यासाठी बोलावल्याचे खोटे सांगत आहे. अमान्य की, फावडे व दगड ओळखत असल्याबाबत खोटे सांगत आहे. मुद्देमालाचे मोजमाप झाले नव्हते. अमान्य की, दिसता परिस्थितीचा नकाशा काढून हे खोटे सांगत आहे. अमान्य की, फिर्यादीस मदत व्हावी म्हणून साक्ष देण्यास आलो. हे म्हणणे खरे आहे की, मी सही करुन ५ मीनीटात निघून गेलो त्यामुळे मला काही माहित नाही. अमान्य की, अमान्य की खोटा सरतपास नोंदविला व खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

दि.२३.०२.२०२६

श्रवणोत्तर स्वीकृती

MAHESH RAMCHANDRA BADAKH

Digitally signed by MAHESH RAMCHANDRA BADAKH
Date: 2026.02.25 11:03:13 +0530

श्री. एम. आर.बडाख

न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, न्यायालय क्रं.३ आष्टी